# NAGARPANCHAYAT SOYGAON
# कार्यालय नगरपंचायत सोयगाव

**ता.सोयगाव,जि.औरंगाबाद .** Email: npsoegaon@gmail.com

**जा.क्रं.कावी /बा.वि./अं.वि.प./ २०१९ दि: /०६/२०१९**

**परिशिष्ट डी-१**

**बांधकाम परवानगी**

**प्रति,**
**श्री.अण्णा धोंडीराम नागणे,**
**योगेश्वरी बिल्डर्स.**

एमआरटीपी कायदा,१९६६ चे कलम ४४ तसेच महाराष्ट्र नगर परिषद व औद्योगिक वसाहत कायदा, १९६० चे कलम १८९ नुसार आपण दिनांक ०१/०६/२०१९ रोजीच्या अर्जान्वये नगरपंचायत कार्यालयाकडे सोयगाव येथील गट क्रमांक १. क्षेत्र ६०००.चौ.मी.मधील प्लॉट क्रं. १/४ क्षेत्र. 450.320 चौ.मी पै.317.30 चौ मी. इतके निवासी प्रयोजन करिता (रो हाऊसेस प्रकल्प ) प्लॉटमध्ये निवासी बांधकाम/रो हाउस प्रकल्प सुरू करण्याचा दाखला/बांधकाम परवानगी मिळण्यासाठी विनंती अर्ज केलेला आहे. त्या अनुषंगाने कलम ४५ नुसार खालील अटींवर आपणास बांधकाम परवानगी देण्यात येत आहे.

1) सेटबॅक नियमाच्या अमलबजावणी नुसार मोकळ्या सोडलेल्या जमिनी या सार्वजनिक रस्त्याचा भाग होणार आहेत.
2) भोगवटापत्र घेतल्याखेरीज कोणत्याही नवीन इमारतीचा किंवा त्यांच्या भागाचा वापर चालू करता येणार नाही किंवा अन्य व्यक्तीस तसा वापर चालू करण्यासाठी अधिकार देता येणार नाही.
3) काम सुरू करण्याच्या दाखल्याचे मुदत तो दिलेल्या दिनांकापासून एक वर्षापर्यंत राहील.
4) ही परवानगी मिळाली तरी मालकी नसलेल्या जागेमध्ये बांधकाम करण्यास अर्जदार पात्र ठरत नाही.
5) या कार्यालयाने विषयांकित प्रकरणी पत्र क्रमांक ०९/०५/२०१९ रोजी विकास अभिन्यास मंजुरीची शिफारस करताना नमूद केलेल्या सर्व अटी व शर्तींचे पालन करणे अर्जदारावर बंधनकारक राहील.
6) प्रकरणी वास्तुविशारद यांनी सादर केलेले नकाशाच्या आधारे उक्त शिफारस करण्यात येत असून, प्रत्यक्षात या व्यतिरिक्त बांधकाम झाल्यास, त्या संबंधित अर्जदार/जमीन मालक, विकासक/वास्तुशिल्पकार जबाबदार राहतील.
   i. बांधकामाच्या ठिकाणी डिस्प्ले बोर्ड लावणे व त्यावर खालील प्रमाणे तपशील नमूद करणे आवश्यक राहील. स.न /सि.स.नं/वास्तुविशारद /कॉन्ट्रॅक्टरची नावे व पत्ते इत्यादी.

ii. भूखंडाचा तपशीलबांधकाम परवानगी व दिनांक ,.
iii. अनुज्ञेय करण्यात आलेले बांधकाम क्षेत्र.
iv. मंजूर नकाशाची प्रत ज्या ठिकाणी पहावयास मिळेल त्या ठिकाणाचा/कार्यालयाचे नाव व पत्ता.

7) प्रस्तावित प्रकल्पास भूकंपरोधक व्यवस्था करणे तसेच संपूर्ण प्रकल्पास अग्निप्रतीबंधात्मक यंत्रणा बसविणे अर्जदारास बंधनकारक राहील.
8) वरील जागेचा व नियोजित इमारतीचा वापर निवासी वापरासाठी करण्यात यावा व बांधकाम मंजूर नकाशाप्रमाणे असावे.
9) स्थलदर्शक नकाशावर दर्शविल्याप्रमाणे नियोजित बांधकामापासून पुढील,मागील व बाजूची अंतरे प्रत्यक्षात जागेवर असलेली पाहिजेत व त्याखालील जागा कायम खुली ठेवावी ही सर्वस्वी जबाबदारी वास्तुविशारद यांची राहील.
10) नियोजित बांधकामाचे भूखंडातील अस्तित्वातील अन्य बांधकाम धरून एकूण क्षेत्र, सुविधा क्षेत्र व प्रादेशिक योजना रस्ते, रस्तारुंदी क्षेत्र वगळता उर्वरित निव्वळ क्षेत्राच्या नकाशावर दर्शविले इतके प्रत्यक्ष जागेवर कमाल राहिले पाहिजे.
11) नियोजित इमारतीमध्ये एक दशांश रूमचे क्षेत्र वायुवीजन उपलब्ध असणे आवश्यक राहील.
12) नियोजित इमारत विकासासाठी आवश्यक असणारे पाण्याची सोय व सांडपाण्याची आणि मैला निर्मूलनाची व्यवस्था नसल्यास प्रत्यक्ष वापरापूर्वी अर्जदाराने केली पाहिजे.
13) नियोजित बांधकामास मंजुरीपेक्षा वेगळे बदल करावयाचे असल्यास किंवा वापर बदलायचा असल्यास या कार्यालयाची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे.
14) नियोजित बांधकामामुळे भूखंडावर असलेल्या कोणाच्याही वहीवाटच्या भंग होणार नाही याची जबाबदारी अर्जदाराची राहील.
15) बांधकाम करताना स्ट्रक्चरल सेफ्टी व क्वालिटी कंट्रोल /गुणनियंत्रण संबंधी अनुषंगिक नियमांचे पालन करणे बंधनकारक राहील.
16) इमारतीचे आरसीसी डिझाईन स्ट्रक्चरल इंजिनियर यांनी मंजूर करणे आवश्यक राहिल.
17) बांधकाम करतेवेळी कामगारांच्या सुरक्षेविषयी आवश्यक ती खबरदारी विकासकांनी घेणे बंधनकारक राहील.
18) बांधकाम नकाशाची छाननी,अनुज्ञेय चटई क्षेत्र, भूव्याप्त क्षेत्र, मालकी हक्क इत्यादी. याबाबत मालमत्ताधारक, वस्तू शिल्पकार जबाबदार राहतील. तसेच प्रस्तावातील बांधकामाचे क्षेत्र,चटई क्षेत्र व मंजूर विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील उल्लंघन याबाबत संबंधित वास्तुविशारद व अर्जदार जबाबदार राहतील.
19) सिंचन विभागाच्या लगतच्या चारीक्षेत्रात कुठलेही बांधकाम अनुज्ञेय राहणार नाही.
20) रेन वॉटर हार्वेस्टिंग अर्जदार यांनी इमारतीची वापरापूर्वी स्वखर्चाने करावायची आहे.
21) शक्यतो सौर ऊर्जेवर पाणी तापविण्यासाठी यंत्र अर्जदाराने करायचे आहे, तसेच शक्यतो सौर ऊर्जावर रस्त्यालगतचे पथदिवे बसविण्यात यावे.

22) वेस्ट वॉटर ट्रीटमेंट यंत्रणा स्वखर्चाने अर्जदार यांनी करावयाची आहे. पाण्याचा फेरवापर बगीचा, झाडांना जोपासण्यासाठी करणे आवश्यक आहे.

23) प्रस्तुत प्रकरणातील जमिनीवर कोणतेही बांधकाम सुरू केल्यानंतर जोते तपासणी प्रमाणपत्र घेतल्याशिवाय पुढील बांधकाम करता येणार नाही.

24) सदरचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर निवासी वापर सुरू करण्यापूर्वी वर नमूद सर्व अटींची पूर्तता करून भोगवटा प्रमाणपत्र घेणे बंधनकारक राहील.

25) विषयांकित प्रकरणी अर्जदार यांनी सादर केलेली कागदपत्रे दिशाभूल करणारी आढळून आल्यास ही बांधकाम परवानगी रद्द समजण्यात येईल.

**मुख्याधिकारी**
**नगरपंचायत सोयगाव**